अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. ११ ऑगस्ट २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३१३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## 'मातोश्री' बाहेर मुस्लीम समाजाचे आंदोलन

✔ **मुंबई** : माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानाबाहेर मुस्लीम समाजाच्या संघटनांनी जोरदार आंदोलन केले. वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकावर उद्धव ठाकरेंची भूमिका काय असा सवाल विचारत मुस्लीम संघटनेच्या कार्यकर्त्यांनी उद्धव ठाकरेंविरोधात घोषणाबाजी केली. विधेयकाच्या चर्चेवेळी ठाकरेंचे ९ खासदार सभागृहातून बाहेर गेले असा आरोप संघटनांनी केला.



नुकतेच संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मोदी सरकारने वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक सादर केले. मात्र विधेयकाच्या चर्चेवेळी उद्धव ठाकरे गटाच्या खासदारांची भूमिका समोर आली नाही. त्यावरून नाराजी व्यक्त करत वांद्रे येथील उद्धव ठाकरेंच्या निवासस्थानाबाहेर मुस्लीम संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमले. यावेळी घोषणाबाजी करण्यात आली.

# गळा दाबून खून, प्रेत नदीत फेकले, बेपत्ता महिलेच्या खुनाचे गूढ उलगडले

## अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेतले

## रिक्षा चालकाच्या पापाचा घडा अखेर भरला

✔ सुराज्य/सोलापूर

**शहरातील एका साठ वर्षीय वयोवृद्ध महिलेचा गळा आवळून तिचा खून केला. पुरावा नष्ट करण्यासाठी तिचा मृतदेह सोलापूर- पुणे हायवेवरील लांबोटीजवळच्या सीना नदीत फेकून दिला. साळूबाई नागेश वाघमोडे (वय ६० रा. ७८, स्वागत नगर, एमआयडीसी) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी संशयित आरोपी दीपक साळुंखे (वय ४०,रा.जय मल्हार नगर, बाळे व विधी संघर्षग्रस्त बालक) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून दीपकला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**

पोलिसांकडून प्राथमिक स्वरूपात हाती आलेल्या माहितीनुसार दीपकने साळूबाईलचा तोंडात स्कार्फचा बोळा घालून आणि गळा आवळून तिला खलास केले. तिच्या अंगावरील सोने चोरी करण्याच्या उद्देशाने ओरबडून घेतले. जीव गेल्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी त्याने तिचे प्रेत लांबोटीजवळच्या सीना नदीवरील पुलावरून नदीत टाकून दिले. साळूबाई ह्या तरटी नाका येथून त्याच्या रिक्षात बसल्या होत्या. ही घटना २७ जुलै रोजी दुपारी तीन वाजताची आहे.

दरम्यान साळुबाई ह्या घरी न आल्याने अशोक वाघमोडे यांनी नातेवाईकांकडे चौकशी केली. पण ती सापडली नाही. अखेर अशोक यांनी २५ जुलैला जोडभावी पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल केली. दरम्यान मोहोळ पोलिसांकडून खबर मिळाल्यानंतर जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी तिकडे तपास केला. नदीतील छिन्न-विछिन्न झालेला मृतदेह मुलाने अंगावरील कपड्यावरून ओळखले. त्यानंतर तपासाची चक्रे फिरवून पोलिसांनी दीपकला ताब्यात घेतले.पहिल्यांदा त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली पण पोलिसांनी खाक्या दाखवताच त्याने सारा घटनाक्रम सांगितला.



मृत : साळूबाई वाघमोडे

संशयित आरोपी क्रमांक एक व दोन यांनी संगनमत करून चोरी करण्याच्या उद्देशाने साळूबाईचा गळा आवळून तोंडामध्ये स्कार्फ कोंबून जिवे ठार मारल्याची पोलिसांची माहिती आहे. याप्रकरणी पोसई नागेश रामदास येळे जोडभावी पेठ पोलीस ठाणे) यांनी फिर्याद दिली आहे. तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण हे करीत आहेत.

### अनेक प्रश्न उपस्थित

या प्रकरणातून अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.साळूबाई आणि दीपक यांचा काय संबंध होता. साळुबाई जाताना घरातून का सांगून गेल्या नाहीत.कुठे जाणार हेही का सांगितले नाही.साळूबाई यांच्या मृतदेहाचे काय झाले.पीआय चव्हाण,त्यांची टीम तपासाकामी लांबोटीला गेले होते.तिथे काही धागेदोरे हाती लागताच त्यांच्यासह त्यांची टीम शनिवारी रात्री उशीरा कामतीला गेले होते. या तपासातून ठोस माहिती काय उजेडात येते, याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागून आहे.

### आज कोर्टात दाखल करणार

रिक्षा चालक दीपकला आज रविवारी कोर्टात दाखल करणार असल्याचे सांगण्यात आले.

## 'मुलाच्या नोकरीच्या आड आल्यास खल्लास करीन'

✔ **सोलापूर** : माझ्या मुलाच्या नोकरीच्या आड आल्यास खल्यास करील असे म्हणत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकि दिल्याप्रकरणी एका शासकिय नोकरदारांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकिकत अशी कि,फिर्यादी हे सुद्धा शासकिय नोकरदार आहेत. त्यांच्या बहिणींने अनुकंपा तत्वाखाली नेहरूनगर येथे असलेल्या एका संस्थेत मुलीच्या नोकरी करिता अर्ज केला होता. संशयित आरोपीने सुद्धा मुलासाठी त्या ठिकाणी अर्ज दिला आहे.

**कर्मचाऱ्याची कर्मचाऱ्यास धमकी**

त्याचा राग मनात धरून संशयित आरोपी याने शुक्रवारी दुपारच्या सुमारास मुरारजी पेठेत असलेल्या शासकिय कार्यालयात फिर्यादीस शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकि दिली.अशी फिर्याद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे.

विशेष म्हणजे दोघेही एकमेकांच्या ओळखीचे आहेत आणि शासकिय नोकरदार आहेत. फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून घटनेचा अधिक तपास पोलीस करित आहे.

## गर्दीचा फायदा घेत पावणे चार लाखांचे दागिने लंपास

✔ सुराज्य/सोलापूर

जुना पुना नाका गणपती मंदिराजवळ मनोज जरांगे यांच्या रॅलीमध्ये गेले असता गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने चौघांचे तीन लाख ७० हजार रुपये किमतीची सोन्याची चैन चोरून नेल्याची घटना ७ ऑगस्ट रोजी दुपारी बारा ते तीन वाजण्याच्या सुमारास घडली.

याप्रकरणी प्रकाश बलभीम डांगे (वय-५५,रा.सी-२८८ सिंधू विहार जुळे सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, ७ ऑगस्ट रोजी मनोज जरांगे यांची रॅली होती. रॅलीमध्ये गेले असता फिर्यादी व फिर्यादीच्या परिचयाचे विश्वास सुखदेव पवार, अमोल दिगंबर जगताप, सिद्धेश्वर विठोबा दत्तू यांच्या गळ्यातील सोन्याच्या चैन अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.



यात प्रकाश बलभीम डांगे यांची दोन लाख रुपये किमतीची साडेसात तोळे वजनाची शिवाजी महाराजांचे पेंडलसह असलेली चैन,विश्वास सुखदेव पवार यांची ५० हजार रुपये किमतीची दीड तोळे सोन्याची चैन, अमोल दिगंबर जगताप यांची ६० हजार रुपये किमतीची दोन तोळे वजनाची सोन्याची चैन तर सिद्धेश्वर विठोबा दत्तू यांची ६० हजार रुपये किमतीची दोन तोळे वजनाची सोन्याची चेन असा एकूण तीन लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास सपोनि. धायगुडे करीत आहेत.

**भंडीशेगाव येथील घटना**

## अनोळखी वाहनाच्या धडकेने वृध्द ठार

**पंढरपूर** : वेगाने जाणाऱ्या अनोळखी चार चाकी वाहनाच्या धडकेने सायकल वरील ज्येष्ठ नागरिक गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात भंडीशेगाव तालुका पंढरपूर येथील वेळापूर रस्त्यावर शुक्रवारी सकाळी घडला.

दत्तात्रय रामचंद्र पवार (वय ६०रा. भंडीशेगाव ता.पंढरपूर) असे मयताचे नाव आहे. काल सकाळी ७ वाजेच्या सुमारास ते सायकलवरून येथून शेतातील वस्तीकडे निघाले होते. वेळापूर रोडवरील अंबाबाई मंदिराजवळ पाठीमागून अनोळखी चार चाकी वाहन धडकल्याने ते सायकलवरून कोसळून गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मयत झाले. या अपघाताची फिर्याद मयताच्या मुलगा मयूर पवार (वय २७) यांनी पंढरपूर ग्रामीण पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला . हवालदार सुरवसे पुढील तपास करीत आहेत.

**अंकलगी येथे शेतीच्या वादातून मारहाण**

सोलापूर : भावकीतील शेत जमिनीच्या वादातून काठी आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत महिलेसह दोघेजण जखमी झाले. ही घटना अंकलगी (ता. अक्कलकोट) येथे शुक्रवारी घडली. अनिता मल्लिकार्जुन बरगुडे (वय ४०) आणि त्यांचा मुलगा आदर्श बरगुडे (वय १४ दोघे रा.अंकलगी) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## काम आटोपून गावाकडे निघालेल्या दोघांना मारहाण

**मजरेवाडी परिसरातील घटना**

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेतील काम आठवून गावाकडे निघालेल्या दोघांना मजरेवाडी गोशाळेसमोर दहा ते बारा जणांनी अडवून बांबू व पीव्हीपी पाईपने बेदम मारहाण केली. ही घटना शनिवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास घडली.

या घटनेची हाकिकत अशी कि,युवराज प्रेमराम बनसोडे (वय ३४), वीरेंद्र प्रतापसिंह दोरतले (वय-३४ दोघे रा.हिपळे तालुका दक्षिण सोलापूर) हे जिल्हा परिषदेतील घरकुलाचे काम आटपुन गावाकडे निघाले असताना मजरेवाडी जवळ ही घटना घडली. युवराज बनसोडे यास बेदम मारहाण झाली. दोघांनाही उपचाराकरिता सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. मारहाण करणाऱ्यांनी कोणत्या कारणामुळे मारहाण केली.याचा तपास घेतला जात आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## सहा घरफोडीचे गुन्हे उघडकीस; दीड लाखांचा ऐवज हस्तगत

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर

उत्तर सोलापूर तालुक्यातील पाकणी येथील रवींद्र मधुकर शिंदे यांचे मौजे पाकणी, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर हॉटेल स्वराज्य परमीट रूम व बारच्या किंचनच्या खिडकींचे लोखंडी गज तोडून अज्ञात चोरटयाने परमीट बारमधील ३६ हजार किंमतीचे वेगवेगळ्या कंपन्याचे लेबल असलेल्या मद्यचे बॉक्स चोरीला गेले म्हणून फिर्याद दिली. त्यानुसार सोलापूर पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानंतर ताब्यात घेतलेल्या रामचंद्र उर्फ पिंट्या हरिषचंद्र काळे ( वय वर्ष ३२ ) , किसन गंगाराम पवार ( वय वर्ष ४८, दोघे ही रा. रानमसले ता. उत्तर सोलापूर ) दोन्ही आरोपी यांना दिनांक ०४.०८.२०२४ अटक करून न्यायालया समक्ष हजर केले असता न्यायालयांनी २ दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली होती.

सदर पोलीस कस्टडी दरम्यान त्या दोघांचे विचारपूस करता त्यांनी वर नमूद गुन्हयातील गेला माल पैकी १५ हजार किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या व्यतिरिक्त दोघांकडुन खालील नमूद गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत केला आहे. सोलापूर तालुका, पोलीस ठाणे १७१/२०२४ या गुन्हयातील चोरीस गेली गॅस व ते नेणे करीता वापरण्यात आलेली दुचाकी मोटारसायकल असा एकूण ५२,५००/-रूपये किंमतीचा मुद्देमाल, मोहोळ पोलीस ठाणे गुरनं ४८२/२०२४ या गुन्हयातील %%१५/- रूपये किंमतीचा मुद्देमाल, मोहोळ पोलीस ठाणे गुरनं ४११/२०२४ या गुन्हयातील ४८ हजार किंमतीचे एलोरा कंपनीचे कांदा बीयाचे एकूण ४० पॉकिट, मोहोळ पोलीस ठाणे गुरनं ४७१/२०२४ या गुन्हयातील १२,४७०/-रूपये किंमतीच्या विविध कंपनीच्या तेलाच्या बाटल्या, वैराग पोलीस ठाणे गुरनं १६२/२०२४ या गुन्हयातील १०,३००/-रूपये किंमतीचे ४० इंची टी.व्ही १ ड्रील मशीन, पाण्याचा तसेच घरफोडी चोरी करणे करीता वापरलेली हत्यार हस्तगत केले आहे.

# सुप्रीम कोर्टाचा दणका शिंदे सरकारला धक्का

## शिक्षण सम्राटांची खुशामत करण्याचा प्लॅन बारगळला : ईडब्लूएस वर्गातील बालकांना मिळाला न्याय

✔ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

राज्यातील महायुतीच्या सरकारला सुप्रीम कोर्टाचा शनिवारी मोठा दणका बसला. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (राईट टू एज्येकशन अर्थात आरटीई) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्षण सम्राटांची खुशामत करण्यासाठी यात ऐनवेळी केलेला बदल कोर्टाने रद्दबातल ठरवला.

सरकारी अनुदानित शाळेच्या १ किमी परिघातील खासगी शाळांना पूर्व प्राथमिक वर्गातील २५ टक्के जागा आरक्षित ठेवण्यापासून सूट देण्यात आली होती. कोर्टाने हा निर्णय रद्दबातल ठरवल्याने शिंदे सरकार तोंडघशी आपटले आहे. न्यायालयाच्या या निर्णयाने आर्थिक दुर्बल घटक अर्थात ईडब्लूएस वर्गातील मुला -मुलींना न्याय मिळाला आहे.या वर्गातील मुला-मुलींना चांगल्या शाळेत शिकण्याचा हक्क आहे,असा निर्वाळा कोर्टाने दिला आहे.



मोफत व सक्तीचे शिक्षण (आरटीई) कायद्यांतर्गत ६ ते १४ वयोगटातील मुला-मुलींना शिकवण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. त्यासाठीच आरटीईचे खास नियम तयार करण्यात आले आहेत, ज्यात समाजातील वंचित व दुर्बल घटकांसाठी खासगी विनाअनुदानित शाळेत २५ टक्के जागा राखीव ठेवल्या जातात. या मुलांच्या शिक्षणाचा खर्च राज्य सरकार करते. आरटीईच्या नियमांत शालेय शिक्षण (प्राथमिक) विभागाने ९ फेब्रुवारी २०२४ रोजी यात दुरुस्ती केली. ज्यात खाजगी शाळांना आरटीई प्रवेशातून वगळण्यात आले. त्यासाठी सरकारने एक अध्यादेशही काढला होता. या निर्णयाविरोधात डझनभर याचिका पहिल्यांदा मुंबई उच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या.या निर्णयाने समानता येणार नाही तसेच लाखो विद्यार्थी जवळपासच्या शाळेतून शिक्षणापासून वंचित राहतील,अशी हरकत घेतली होती.मुंबईच्या कोर्टाने जुलै २०२४ या महिन्यात हा निर्णय नियमबाह्य ठरवला होता.त्याला सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले होते. त्यावर सुनावणी झाली. सुप्रीम कोर्टाने मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत सरकारचा अध्यादेश रद्द बातल ठरवला.



### मुंबई कोर्टाने काय म्हटले होते

समाजातील वंचित व आर्थिक दुर्बल घटकातील मुलांसाठी खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद कायद्यात आहे. मात्र सरकारी शाळेपासून एक किमी अंतरावर असलेल्या खासगी विनाअनुदानित शाळांना तुम्ही या तरतुदीतून वगळलात, याचा अर्थ एखाद्या गरीब मुलाला इंग्रजी शाळेत शिक्षण घेण्याची इच्छा असली तरी तो तिथे प्रवेश घेऊ शकणार नाही, असे खडेबोल हायकोर्टाने राज्य शासनाला सुनावले होते.

### वर्गभेद निर्माण होणार होता

राज्य सरकारने खासगी विनाअनुदानित शाळांना दिलेली सूट अन्यायकारक होती. त्यातून वर्गभेद निर्माण होणार होता. गरिबांसाठी मराठी शाळा व श्रीमंतांसाठी इंग्रजी शाळा अशी विभागणी झाली होती. उच्च न्यायालयाच्या निर्णयाने गरीब विद्यार्थ्यांचे हित जोपासले गेले असल्याचे मत विधी क्षेत्रातून त्यावेळी व्यक्त झाले होते. कायदा काय सांगतो.

### नेमका काय बदल केला?

आरटीई मधील कलम १२ नुसार खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये कमीत कमी २५ टक्के जागा वंचित आणि दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवणे आणि आठवी पर्यंत मोफत शिक्षण बंधनकारक आहे. राज्य सरकारने ९ फेब्रुवारी रोजी अध्यादेश काढला होता. ज्या खासगी विनाअनुदानित शाळांच्या १ किमी परिसरात शासकीय किंवा अनुदानित शाळा आहेत, अशा शाळांना २५ टक्के प्रवेशांबाबतची अट लागू नसेल, असा बदल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने केला होता.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



या पुढे आपण एकमेकांशी 'डायरेक्ट' बोललो तर!

कल्याण

459-87-160

CMYK